साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास - विशेष संदर्भ : पुणे जिल्हा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानविद्या शाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीसाठीच्या शोध प्रबंधाचा सारांश आराखडा

-: संशोधक :-

निखिल गणेश जगताप

(एम.ए.)

मु.पो.पाबळ ता.शिरूर जि.पुणे

-: मार्गदर्शक :-

डॉ. एम. बी. बेलखेडे

राज्यशास्त्र विभाग

(हुतात्मा पानसरे महाविद्यालय,अर्जापूर)

मार्च २०२२

प्रास्ताविक :-

महाराष्ट्रातील राजकीय व्यवस्थेमध्ये फार पूर्वी पासून मराठा जातीचा प्रभाव असल्याचा दिसतो. महाराष्ट्रातील राजकारणात असणारे त्यांचे स्थान व भूमिका महत्वाची आहे . महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या राजकारणामध्ये मराठा जातीने कणखर नेतृत्व केल्याचे दिसून येते . मराठा जातीचे राजकीय नेते सक्षमपणे राजकीय पटलावर वावरताना दिसतात .

संशोधनामध्ये संशोधन विषयाची व्यापकता महत्वाची असते. पुणे विद्यापीठाच्या एम. ए अभ्यासक्रमामध्ये असलेल्या 'महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया' या विषयातील घटक – जात आणि राजकारण या घटकाचे अध्ययन करत असताना मराठा जातीचा राजकीय प्रभाव या विषयी जिज्ञासा निर्माण झाली . यातूनच राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था मधील मराठा जातीचा राजकीय प्रभाव या विषयी माहिती घेण्याचा प्रयत्न करत आहे या अनुषंगाने महाराष्ट्रातील मराठा जातीचा राजकीय प्रभाव आणि त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास या विषयी अभ्यासाची जिज्ञासा निर्माण झाली. व "साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ : पुणे जिल्हा" या विषयाचा विश्लेषणात्मक व चिकित्सक पद्धतीने अभ्यास करण्यासाठी मी विद्यावाचस्पती या पदवीसाठी हा विषय निवडत आहे. महाराष्ट्रातली सध्याची राजकीय परिस्थिती बदलल्यामुळे पारंपारिक मराठा नेतृत्व संपुष्टात आलं की काय? अशी चर्चा सुरू आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातलं काँग्रेस आणि मराठा नेत्यांचं वर्चस्व १९९५ पासूनच घसरत आहे. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालाने मराठा राजकारणाचा शेवट झाला आहे असं मत ज्येष्ठ राजकीय विश्लेषक सुहास पळशीकर यांनी व्यक्त केलं आहे. "मराठा समाजाच्या हातात राजकारणाच्या नाड्या असण्यामागे केवळ आर्थिक पाठबळ आणि स्थानिक पातळीवरचं संघटन कौशल्य हेच जबाबदार नाही तर सांस्कृतिक माध्यमांतून मराठे सत्ताधारी वर्ग असल्याचं दिसते. अशी मते राजकीय विश्लेषकाकडून पुढे येऊ लागली आहेत.

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्याचा विचार करता ग्रामीण व शहरी (नागरी) असे दोनही प्रकारच्या क्षेत्रांत एकूण २१ विधानसभा मतदारसंघ असून या पैकी तब्बल १६ हून अधिक म्हणजेच ७८ टक्के पेक्षा अधिक हे मराठा जातीचे आमदार प्रतिनिधित्व करीत आहेत. अनुकूल भोगोलिक परीस्थिती, उंचावलेले जीवनमान, प्रभुत्वशाली पक्षामधील राजकीय स्थान इत्यादी अनेक कारणांमुळे मराठा जात समूह राजकीय दृष्ट्या प्रस्थापित झालेली

दिसतात. परंतु दुसऱ्या बाजूला आरक्षणाची मागणी आर्थिक व सामाजिक मागासलेपण, गरीबीचे वाढते प्रमाण या कमकुवत बाजू मराठा जातीमध्ये दिसून येतात. महाराष्ट्राची सामाजिक विभागणी उच्चजाती, मध्यजाती व इतर मागासजाती तथा ओ.बी.सी. , दलित अनुसूचित जाती, जमाती, मुस्लीम, भटके –विमुक्त अशी आहे. या मधील संखेने सर्वात जास्त ३२ टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या असलेला मराठा समाजातील बहुसंख्य लोक प्रामुख्याने शेती क्षेत्रात निगडीत आहेत. तसेच राजकारणाच्या माध्यमातून साखर कारखाने, सुत गिरण्या, दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री, शेती उत्पादनाशी पूरक उद्योगधंदे व सहकाराच्या माध्यमातून भरघोस प्रगती करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा निवडणुकांच्या माध्यमातून सबंध महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा समाजाचे वर्चस्व आहे.

मराठा जातीतील बहुसंख्य लोक छोटे शेतकरी, गरीब, भूमिहीन, शेतमजूर आहेत. म्हणून काही पक्ष, संघटना मराठा जातीला कुणबी म्हणून ओबीसी च्या राखीव जागा मिळाव्यात अशी मागणी सातत्याने उचलून धरताना दिसतात. महाराष्ट्राच्या सक्रीय राजकारणावरील राजकीय प्रभाव पाहता संखेने ३२ टक्के असलेली मराठा जात सर्व पक्षात विभागली गेली आहे. राष्ट्रवादी कॉग्रेस, कॉग्रेस, सेना, भाजप, अपक्ष आणि इतर पक्षातून मराठा सामाजाचे प्रतिनिधी निवडून येतात. अनेक पक्षाच्या गटामध्ये विभागणी होऊनही मराठा सामाजाचे एकूण प्रतिनिधी हे विधानसभेमधील २८८ पैकी सरासरी ११० – १२० पर्यंत निवडून येतात. महाराष्ट्राच्या राजकारणात कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी मराठा सत्तेत असतात.

भारतामध्ये जातीच्या आधारावर आरक्षणाची तरतूद असलेली दिसते. मंडळ आयोगाच्या (१९८०) शिफारशी भारत सरकारने स्वीकारल्या मुळे ओबीसी च्या राजकारणाला महाराष्ट्रात १९८९ नंतर बरीच गती मिळाली. मराठा समाजाला हे आरक्षण मिळाले नाही.परंतु महाराष्ट्राच्या राजकारणात ओबीसींचे प्रतिनिधित्व वाढले तरी मराठा जातीचे कमी झाले नाही. महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाच्या खालोखाल लोकसंख्या असलेली जाती समाज विविध प्रस्थापित पक्षात विभागलेली आहेत.मराठा सत्तेला शह देण्यासाठी अधूनमधून माळी, धनगर,वंजारी या जाती एकत्र आणण्याचे प्रयत्न झाले यास पक्षीय राजकारण बळी पडले. महाराष्ट्राच्या राजकारणात जातीय राजकारणाचे चित्र दिसून येते व जाती जाती मध्ये राजकीय प्रभाव कमी अधिक होताना

दिसतो. महाराष्ट्राच्या सामाजिक – राजकीय जीवनात अनेक चढ-उतार, स्थित्यंतरे झाली. आता वेगवेगळे जाती समूह राजकारणात पुढे येऊ लागले आहेत त्यातून जातींचेच राजकारण होताना दिसते.

भारतासारख्या देशात विविध जाती, धर्म, पंथ अशी विविधता दिसते. घटक राज्यांच्या निर्मितीतून प्रत्येक घटक राज्यात एक किवा एकापेक्षा अधिक काही ठराविक जातीचा प्रभाव संबंधित घटक राज्यांच्या शासन व्यवस्थेवरती असलेला दिसतो. विशिष्ट जात समूहाच्या भोवती राजकारण फिरताना दिसून येते आणि कळत नकळत जातीचे राजकारण सुरु होऊन जातींना राजकीय दृष्टीकोनातून महत्व प्राप्त होत असते. तसेच काहीसे मराठा जात समूहाचे महाराष्ट्रामध्ये झालेले दिसते. मराठा जातीचा प्रभाव मतदानाच्या माध्यमातून दिसून येतो परंतु त्यांचे प्रतीनिधी त्याप्रमाणात दिसून येत नाही. विविध क्षेत्रामध्ये असणारे मराठा जातीचे नेतृत्व व सहभाग यांचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा जात समूहाचे वर्चस्व टिकवण्यासाठी विविध राजकीय नेतृत्व प्रभावी भूमिका बजावतात. महाराष्ट्रामध्ये विविध सहकारी संस्था कार्यरत आहेत त्या मध्ये मराठा जातीची भूमिका महत्वाची आहे. त्याचा परिणाम कळत नकळत राजकारणावर होत असतो. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मराठा जातीची भूमिका महत्वपूर्ण भूमिका निभावते. महाराष्ट्रामध्ये मराठा जातीची प्रत्यक्ष राजकीय, आर्थिक, सामाजिक स्थिती अभ्यासणे आवश्यक आहे. संशोधनाच्या माध्यमातून मराठा जाती व्यवस्थेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध घटकांवर असलेला मराठा जातीचा प्रभाव त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणावर होणारा परिमाण अभ्यासणे गरजेचे आहे.

भारतीय राजकारणामध्ये जाती जातींचे संघटन करून निवडणुकीवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न स्वातंत्र्यानंतर मंडळ आयोगाच्या अहवालानंतर अधिक सुरु झाला. स्वातंत्र्यानंतर साठोत्तर महाराष्ट्रात जातींचे राजकारण कमी होण्याऐवजी ते वाढतच गेले. या अनुषंगाने महाराष्ट्राच्या राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव अभ्यासणे प्रासंगिक ठरणार आहे. या साठीच "साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ : पुणे जिल्हा" या विषयावर संशोधन करण्याचे ठरवले आहे.

जातीचा राजकीय प्रभाव –

सामान्यतः शासन जे निर्णय घेईल ते जनतेच्या हिताचे आणि सर्वांगीण विकासाचे असावे अशी लोकांची इच्छा असते. लोक राजकारणावर प्रभाव पाडण्यासाठी दबावगटांची निर्मिती करणे, लोकांना संघटीत करणे, सदस्य होणे, शासनाला मागण्या सदर करणे, मोर्चे काढणे, विविध चळवळी उभारणे, आंदोलने करणे, संप करणे, अहिंसात्मक व अहिंसात्मक मार्ग अवलंबणे या माध्यमातून लोक शासनावर आपला प्रभाव टाकत असतात.यातूनच साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास करता येईल.

जातीय राजकारणाला प्रभावित करणाऱ्या घटकांचा अभ्यास –

राजकारणाला व राजकीय प्रक्रियेला प्रभावित करणारे अनेक घटक आहेत. त्या मध्ये प्रभावशाली जात ही महत्वाची भूमिका बजावते. देशातील, महाराष्ट्रामधील पुणे जिल्ह्यात मराठा जातीला राजकारणामध्ये अधिक प्रतिनिधित्व मिळूनही सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक बाबतीत मागासलेपणा असल्याचे दिसते. प्रामुख्याने वर्ग, जमातगट, भोगोलिक घटक, राष्ट्रीय पक्ष हे राजकीय प्रक्रियेला प्रभावित करणारे घटक म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रामध्ये जातींचा विचार केला तर मराठा, ब्राम्हण व मागासवर्गीय जातीचा प्रभाव प्रामुख्याने राजकारणावर राहिलेला आहे. या जातीमधील मराठा जातीची राजकीय स्थिती त्यांचा सामाजिक, आर्थिक क्षेत्रात असणारा मागासलेपणा या घटकांचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्याचा विशेष संदर्भ घेऊन या विषयाची निवड केली आहे.

संशोधन समस्या –

मराठा जात महाराष्ट्राच्या राजकारणात नेहमीच प्रभावशाली राहिली आहे. साठोत्तर महाराष्ट्रात मराठा जातीची राजकीय समीकरणे बदलेली दिसतात. महाराष्ट्राच्या राजकीय सत्तेवर जरी मराठा जातीचे प्रतिनिधित्व जास्त असले तरी त्या मानाने मराठा जात समूहाची प्रगती झालेली दिसत नाही. राजकारणावर असलेला प्रभाव व त्या मानाने राजकीय, आर्थिक, सामाजिक घटकावरील मराठा जातीची पकड जास्त असून मराठा जात समूह हा समाजाच्या मुख्य प्रवाहापासून काही प्रमाणत वंचित राहिलेला आहे. “साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ : पुणे जिल्हा”

या घटकाचा चिकित्सक अभ्यास करून मराठा जातीची असणारी राजकीय सक्रियता, राजकीय प्रभाव, मराठा जात समूहाचे महाराष्ट्रामध्ये असणारे विकासात्मक व राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थान या बाबतचा शोध घेणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधन प्रबंधाचे उद्दिष्टे :-

प्रस्तुत विषय मी संशोधना साठी निवडला आहे. या संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे -

१) मराठा जातीचा महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रीयेवरील प्रभाव अभ्यासणे.

२) स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर उदयास आलेल्या मराठा जातीच्या नेतृत्वाचा आढावा घेणे.

३) महाराष्ट्रातील राजकारणावर इतर जाती गटांच्याच्या तुलनेत मराठा जातीच्या राजकीय प्रभावाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

४) मराठा जातीच्या राजकीय प्रभावाच्या सद्यस्थितीची चिकित्सा करणे.

५) मराठा जातीचा महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करणे.

६) मराठा जातीच्या प्रभावाला आव्हान देणाऱ्या विविध घटकांचा अभ्यास करणे.

७) मराठा जातीचे महाराष्ट्रातील राजकारणातील प्रमाण व सद्य स्थितीचा अभ्यास करणे.

८) मराठा जातीच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

९) मराठा जातीच्या राजकीय व आर्थिक परिस्थितीवर दृष्टीक्षेप टाकणे.

१०) मराठा जातीचा असणाऱ्या राजकीय सहभागाचा फायदा हा मराठा समजला कितपत मिळतो या बाबत अध्ययन करणे.

संशोधनाची गृहीतके –

१. महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव मोठ्या प्रमाणत दिसून येत आहे.

२. मराठा जात संघटनांचा व दबाव गटांचा प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर व शासनावर असलेला दिसतो.

३. मराठा जातीच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील राजकारणाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.

४. मराठा जातीच्या प्रभावाला विविध राजकीय आव्हाने निर्माण होत आहेत.

५. राजकारणाच्या विविध क्षेत्रामधून मराठा जातीच्या नेतृत्व शक्ती मध्ये वाढ होताना दिसते.

६. मराठा जातीच्या विविध मागण्याकडे राज्यकर्त्यावर्गाची उदासीनता असल्याचे दिसून येत.

संशोधन क्षेत्र –

संशोधनामध्ये विशिष्ट भोगोलिक क्षेत्र ठरवणे गरजेचे असते.त्यासाठी पुणे जिल्ह्यातील सर्व एकूण १४ तालुक्यातील ४२० व्यक्तीकडून नमुना निवड पद्धती मधील गैरसंभाव्य नमुना निवड पद्धतीने माहिती गोळा करण्यासाठी निवड करणार आहे.

तथ्य संकलन –

गुणात्मक संशोधनाच्या आधारे संबंधित विषयासाठी माहिती गोळा केली जाणार आहे. तसेच प्राथमिक साधनांमध्ये मुलाखत अनुसूची व प्रश्नावली तंत्राचा वापर करणार आहे. दुय्यम स्त्रोतामध्ये वृत्तपत्रे, मासिके, नियतकालिके , शोधनिबंध, प्रकाशित व अप्रकाशित साहित्य, इंटरनेट, प्रशासकीय अहवाल, संदर्भ ग्रंथ या स्त्रोतांचा वापर तथ्य संकलना करिता करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती –

१) महाराष्ट्रातील मराठा जातीचा अभ्यास करण्यासाठी पुणे जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक या सारख्या घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

२) मराठा जातीच्या संघटना व मराठा जातीच्या सामाजिक लढ्यातील योगदान या संदर्भातील अभ्यास पुणे जिल्ह्याचा विचार करून करण्यात येणार आहे.

३) मराठा जातीच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा आढावा त्यांचे असणारे सामाजिक व आर्थिक स्थान, सामाजिक व व्यावसायिक गतिशीलता, शिक्षणाचे प्रमाण, शिक्षणाचे माध्यम, शैक्षणिक कारके या घटकांच्या माध्यमातून घेणार आहे.

४) मराठा जातीचे विविध प्रश्न त्या मध्ये आरक्षण, कर्ज, आर्थिक स्थिती, वैवाहिक दर्जा, स्त्रियांचे समाजातील स्थान अशा विविध प्रश्नाचे अध्ययन केले जाणार आहे.

५) पुणे जिल्ह्यातील निवडक गावांचा व राजकीय संस्थाचा मराठा जातीचा राजकीय प्रभाव व सामाजिक व आर्थिक स्थितिच्या अनुषंगाने अभ्यास केला जाणार आहे.

संशोधनाचे महत्व –

महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती पर्यंत मराठा समाजाच्या नेत्यांना आपली राजकीय महत्वकांक्षा पूर्ण करता आलेली नव्हती. महाराष्ट्र राज्याच्या स्थापने नंतर मात्र मराठा समाजाने महाराष्ट्राच्या राजकारणावरील पकड मजबूत केली.मराठा जाती मध्ये काही ठराविक घराणी राजकारणामध्ये प्रभावी असलेली दिसतात बाकी मराठा समाज राजकीय, आर्थिक, सामाजिक विवंचनेत अडकलेला आहे. मराठा जातीमध्ये एकीकडे सामाजिक प्रतिष्ठा तर दुसरीकडे मराठा हा आज दारिद्र्याच्या खाई मध्ये लोटत चालला आहे. या मराठा जातीमध्ये दारिद्र्य, गरिबी, बेकारीचे प्रमाण कायम वाढलेले दिसून येते. मराठा जातीमध्ये असणाऱ्या या घटकांचा विचार करता संसोधाकाला या विषयाची गरज व महत्व वाटले व मराठा जातीचा राजकारणावरती असणारा प्रभाव अभ्यासणे महत्वाचे ठरेल.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापने पासून आज पर्यंत मराठा समाजानेच वर्चस्व वारंवार सिद्ध केलेले आहे. मराठा जात ही प्रभावी असताना त्यांना विकास पासून वंचित राहावे लागले आहे. त्यांची नेमकी कारणे कोणती ? मराठा जात समूहामध्ये असणारे आर्थिक व राजकीय स्थान हे ठराविक व्यक्ती व गटाकडेच आहे. महाराष्ट्राच्या संपूर्ण भागामध्ये मराठा जातीचा आरक्षणासाठी असलेला लढा दिसतो. महाराष्ट्रात मराठा जातीमध्ये आजही गरिबी, दारिद्र्य आहे . महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रभावी जात म्हणून मराठा जातीचे नाव पुढे येते परंतु त्या मानाने मराठा जातीचा विकास होताना दिसत नाही. म्हणून या संशोधनाच्या माध्यमातून मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थिति या घटकावर प्रकाश टाकण्यात येणार आहे.

पूर्व संशोधनाची थोडक्यात पाहणी

“साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ : पुणे जिल्हा” या विषयावर अद्याप पर्यंत संशोधन झाले नसल्याची मी खात्री केली आहे .

प्रबंधासाठी वापरावयाच्या संशोधन पद्धती –

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना एकच संशोधन पद्धती वापरता येणार नाही .त्यामुळे ठराविक पद्धतच न वापरता गरजेनुसार संशोधन पद्धतीचा उपयोग करणार आहे . सदर संशोधना करीता गरचे नुसार गुणात्मक संशोधन पद्धती, मिश्र किवा बहुल संशोधन पद्धतीचा तसेच संख्यात्मक अभ्यास पद्धती, सर्वेक्षण अभ्यास पद्धती , व्यक्ती अभ्यास पद्धत , तौलनिक अभ्यास पद्धत इ. संशोधन अभ्यास पद्धतीचा वापर करणार आहे .

संशोधांच्या मर्यादा –

१) प्रस्तुत संशोधनात मराठा जातीचा पुणे जिल्ह्याच्या विशेष संदर्भासहित अभ्यास केला जाणार आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

२) प्रस्तुत संशोधनासाठी तात्काळ जातीवर आधारित जणगणनेची आकडेवारी उपलब्ध नसल्यामुळे मराठा जातीचे पुणे जिल्यामध्ये व कोणत्या गावामध्ये किती लोक राहतात याची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाही ही मर्यादा आहे.

३) प्रस्तुत संशोधन जातीवर आधारित असून या मध्ये प्रामुख्याने फक्त मराठा जाती संबंधी अध्ययन केले जाणार आहे.

४) मराठा जातीच्या राजकीय प्रभावाचा अभ्यास करण्यासाठी या जातीतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक घटकांचे अध्ययन केले जाईल.

५) या संशोधनातील सामाजिक जीवनात जातीविषयक निकर्ष फक्त या जातीच्या अनुषंगाने मांडली जातील.

सबंधित साहित्य सर्वेक्षणाचा घेतलेला आढावा –

१) **मराठा जातीतील सामाजिक गतिशीलता व विकासात्मक घटकांचे अध्ययन , या मध्ये प्रा.सागरराज चव्हाण** यांनी सामाजिक गतीशीलतेमुळे व्यक्तीच्या सामाजिक दर्जामध्ये परिवर्तन व बदल घडून येतो. सामाजिक गतिशीलता व मराठा जातीचा अभ्यास केलेला असून जळगाव जिल्ह्यातील मराठा जात अतिशय प्राचिन असून पूर्वीपासून या जातीने स्वतंत्र व स्वाभिमानी अस्तित्व दिसून येते.

२) **पुणे जिल्ह्यातील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास (१९९० ते २०१०), या संशोधनामध्ये प्रा.सोपान घोळवे** यांनी स्थानिक पातळीवरील राजकारणाचा आढावा घेतला आहे त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण व शहरी सहकाराचे राजकारण, पुणे शहराचे राजकारण, संघटना, राजकीय प्रक्रियेतील मध्यवर्ती मुद्दे या घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रामीण भागात अमराठा समाजाचे वर्चस्व असल्याचे दिसून येत आहे. निवडणुकांमध्ये खुल्या जागेवर माळी, धनगर, वंजारी, काही मतदारसंघात ब्राम्हण, सुतार या समाजाला क्वचित संधी मिळालेली आहे नाहीतर मराठा सामाजाचे या जागावर वर्चस्व आहे.

३) **मराठा वर्चस्वाचे बदलते आकृतिबंध, या संशोधनामध्ये प्रा.विवेक घोटाळे** यांनी मराठा वर्चस्व आणि धुरिणत्वाच्या आकृतीबंधात जे बदल झाले त्यांचा त्या बदलांच्या स्वरूप व कारणांचा आणि बदलांतून मराठा वर्चस्वाचा काय परिणाम झाले यांचा अभ्यास चार गावांच्या क्षेत्र अभ्यासाद्वारे केला आहे. मराठा अभिजनास ओ.बी.सी. समाजाचेही आव्हान निर्माण होत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था ओ.बी.सी. समाजाला राजकीय आरक्षण दिल्याने मराठा समाजाच्या स्थानिक सत्तेत वाटेकरी आला आहे. मराठा अभिजानातील फुटीमागे शेती आणि बिगरशेती असा संघर्ष ही दिसतो. शेती अर्थ व्यवस्थेच्या मर्यादा स्पष्ट झाल्याने जमीन मालकी असणाऱ्या मराठा अभिजानाचे वर्चस्व धोक्यात आले. सांस्कृतिक प्रभावातून अभिजन मराठे गरीब मराठ्यांवर प्रभाव निर्माण करून ते आपला राजकीय प्रभाव सिद्ध करतात.

४) **महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्वाचे बदलते स्वरूप , या संशोधनामध्ये प्रा. रविंद्र काळे** यांनी राजकीय नेतृत्वामध्ये असणारी देशसेवा, त्याग, पक्षनिष्ठा, मुल्यनिष्ठाता जसी असावी तशी दिसून येत नाही हा निष्कर्ष मांडला तसेच ते म्हणतात ज्या उदात्त हेतूने स्वातंत्र्यसंग्रामात राजकीय नेतृत्वाने प्राणांची आहुती दिली ते नेतृत्व आजही आपल्या सर्वासाठी आदर्श आहे.

५) **महाराष्ट्रातील ठाकर आदिवासी जमातीचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अभ्यास, या मध्ये प्रा.यासीन सय्यद** यांनी महाराष्ट्रातील भोगोलिक स्थिती, ठाकर जमातीची जीवनपद्धती, ठाकर समाजातील स्त्रियांचा दर्जा, ठाकर समाजाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय स्थितीचे सर्वेक्षण यामध्ये असणारा ठाकर समाजाचा राजकीय सहभाग या घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. आदिवासी समाजात विषमता नष्ट करून समता प्रस्तापित करणारा विकास असावा. देशातील मोठ्या पदावर आदिवासी असल्याचे दिसत नाहीत. बाह्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे विचार आचार संस्कार यात बदल झाल्यामुळे गैर संस्कृतीच्या लोकाकडून आदिवासी संस्कृती बाबत गैरसमज पसरविले आहेत. आदिवाशी समाजामध्ये कुपोषण आणि व्यसनाधिनता दूर करणे गरजेचे आहे. या वर प्रकाश टाकला आहे.

६) **महाराष्ट्राच्या राजकारणावरील जमात्वादाचा प्रभाव, या मध्ये प्रा.राजू म्हस्के** यांनी जमातवादी राजकारणाचे मुख्य बारकावे अभ्यासले असता, जमातवाद हा सामाजिक क्रिया-प्रतिक्रियातून वाढतो. जमातवाद हा संघटीत संस्थात्मक रूप धारण करतो. जमातवाद हा फॅसिस्ट हुकुमशाही प्रवृत्ती जोपासतो. या मध्ये जमात्वादाचा विकास व राजकारण यांचा लेखा जोखा घेण्यात आला.

७) **महाराष्ट्रातील हिंदू दलितांचे राजकारण : मातंग जातीचा विशेष अभ्यास, या संशोधना मध्ये प्रा.विजय तूंटे** यांनीमहाराष्ट्राच्या अनुषंगाने मातंग या जातीसोबतच महार व मराठा या जातीव्यवस्थेचे चित्र रेखाटले आहे. दलितांचे विभाजनवादी राजकारण, दलितांचे निवडणुकीचे राजकारण व मातंग जाती समुदायाचे राजकीय नेतृत्व, मातंगांचे सामाजिक व राजकीय संघटन, मातंग व हिदुत्ववादी शक्ती, मातंग समुदायाचे धर्मकारण या घटकाचा आढावा घेण्यात आला आहे. उत्तर-आधुनिकतावादी युगात मातंग समाज म्हणावा तितका विज्ञानवादी होताना दिसत नाही. ९० टक्के मातंग कुटुंबे हिंदूधर्मा नुसार आचरण करणारे अथवा हिंदू धर्माला मानणारे आहेत.

८) **महाराष्ट्रातील चर्मकार समाजाचे राजकारण या संशोधन प्रबंधामध्ये प्रा. कैलास सोनावणे** यांनी सांगितले कि जात आणि आर्थिक घटक समाजावर परिणाम करतात. चर्मकार समाज एकाच वेळी विविध पक्षांमध्ये आणि गटामध्ये विभागाला गेला त्यामुळे चर्मकार समाजाची राजकारण करण्याची कुवत कमी झाली यातून चर्मकार समाजाची वैचारिक बांधिलकी दिसून येत नाही. चर्मकार समाजाच्या लोक प्रतिनिधीवर राजकीय नेतृत्वाचा खूप मर्यादा आहेत.

संकल्पित प्रबंधाची प्रकरणश: मांडणी

१) प्रकरण पहिले – अभ्यास विषय आणि संशोधन पद्धती –

संशोधन साहित्याचे पुनरावलोकन व आढावा हा शोधनिबंध, जातीव्यवस्थे संदर्भात माहिती, समाजातील मतमतांतरे या संबंधी जे लिखाण उपलब्ध आहे त्या साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे, जातिव्यवस्थेचा उगम, वर्णव्यवस्थेचे स्वरूप, मराठा जातीची राजकीय जागृती, समाजातील मतमतांतरे या संबंधित उपलब्ध साहित्याचा आढावा,. मराठा जातीचा इतिहास, मराठा जातीची उत्पती, पुणे जिल्ह्यातील मराठा जातीच्या विशेष संदर्भात राजकीय व सामाजिक जीवनाचा अभ्यास सर्वेक्षणाच्या व तथ्य संकलनाच्या माध्यमातून करणार आहे.

२) प्रकरण दुसरे – पुणे जिल्हा राजकीय, आर्थिक, सामाजिक, ऐतिहासिक माहिती.

पुणे जिल्ह्याचे स्थान,राजकीय प्रक्रिया, प्रशासकीय व्यवस्था, प्राकृतिक रचना, हवामान, पर्जन्यमान, पशुधन, मानवी जीवनमान, पिक रचना, दळण-वळण, शिक्षण संस्था, सहकारी संस्था, ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्था, लोकसंख्या, व्यापार, कृषी विषयक माहिती, उद्योग धंदे या बाबत थोडक्यात माहिती.

३) प्रकरण तिसरे – साठोत्तर महाराष्ट्रातील मराठा जातीची राजकीय वाटचाल (१९६० – २०२०)

मराठा जातीचे अध्ययन करताना दोन कालखंडामध्ये केले जाणार आहे . प्रथम १९६० ते १९९० हा एक कालखंड राहील व नंतर १९९१ ते २०२० या कालखंडामध्ये मराठा जातीचा राजकीय प्रभाव या दृष्टीने पुढील घटकांचे अध्ययन केले जाईल.- मराठा जातीतील मंत्री, खासदार, आमदार, मुख्यमंत्री,सहकारी संस्था, शिक्षण संस्था यांचे राजकारण, मराठा जातीचे सामाजिक योगदान , राजकीय प्रभावशीलता, जातीय राजकारणाचे स्वरूप, मराठा जातीच्या नेतृत्वाचा अभ्यास,राष्ट्रीय पक्षामध्ये असणारा प्रभाव, स्वतंत्र मराठा राजकीय नेतृत्व, मराठा जातीतील राजकीय तुकडीकरण, वाढते शहरी राजकारण, शिक्षणाचा प्रभाव, मराठा जातीची राजकीय व्यवस्था.

४) प्रकरण चौथे – पुणे जिल्ह्यातील मराठा जात संघटना आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा अभ्यास

मराठा जातीच्या विविध संघटना, मराठा जात संघटनांची मागणी, जात संघटनांचा राजकीय प्रभाव, राजकारणातील जातीय संघर्षाचे मुद्दे, स्थानिक, तालुका, जिल्ह्यातील राजकीय प्रक्रिया, शेतीचे प्रश्न, मराठा आरक्षणाची मागणी, घटनात्मक तरतुदी, मागासवर्ग आयोगाची भूमिका, सामाजिक व राजकीय चळवळी, तत्कालीन राजकारणाचा आढावा, राजकीय पक्षांची भूमिका, स्थानिक नेतृत्वाचा अभ्यास,स्थानिक राजकारणाचा आढावा, राजकीय पक्षांची फाटाफूट, संघटनात्मक राजकीय प्रक्रियेचा आढावा.

५) प्रकरण पाचवे – पुणे जिल्ह्यातील मराठा जातीच्या राजकीय प्रभावाचा अभ्यास

सहकारी संस्थांमधील मराठा जातीचा राजकीय प्रभाव, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद,महानगरपालिका, पुणे जिल्ह्यातील निवडक संस्थामधील मराठा जातीचा राजकीय प्रभाव, निवडक गावांचा मराठा जातीच्या राजकीय संदर्भाने अभ्यास, मराठा जातीतील महिलांचा राजकीय सहभाग व राजकीय प्रभाव, सहकारी संस्थातील राजकीय प्रभाव.

६) प्रकरण सहावे – निष्कर्ष व उपाययोजना

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेला विषय हा "साठोत्तर महाराष्ट्रातील राजकारणावर मराठा जातीचा प्रभाव आणि सामाजिक व आर्थिक स्थितिचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ : पुणे जिल्हा" असून संशोधनाच्या अंतिम काळामध्ये संशोधनाची जी उद्दिष्टे तसेच जी गृहीत परिस्थिती विचारामध्ये घेतली होती त्या अनुषंगाने जे निष्कर्ष समोर येतील त्यांची मांडली करण्यात येणार आहे. या संशोधनातील त्रुटी तसेच उणीवा या बाबतच्या उपयोजानाची मांडणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील मराठा जाती समोरील राजकीय व सामाजिक आव्हाने काही महत्वाचे मुद्दे यांची संकलित माहितीच्या आधारे मांडणी करून निष्कर्ष काढणे व उपाय योजना सुचवणे.

संदर्भ ग्रंथ

1. संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, डॉ. प्रदीप आगलावे ,विद्या प्रकाशन नागपूर , २०००

2. अध्यापन व संशोधन अभियोग्यता, डॉ.शशिकांत अन्नदाते के,सागर ,२०२१

3. बी. बी. सी. न्यूज ३० जुने २०१९ , सुहास पळशीकर

4. प्रादेशिक राजकारण आणि जातीची समीकरणे, जयदेव गायकवाड, हर्मिस प्रकाशन

5. राज्यशास्त्र – महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, र.घ.वराडकर, निराली प्रकाशन २००८

6. भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, डॉ. प्रकाश पवार , डायमंड पब्लिकेशन

7. महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया, डॉ.कैलास सोनवणे, आयडॉल पब्लिकेशन, २०१३-१४

8. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, डॉ.एकनाथ खांडवे, आरती प्रकाशन, २००९

9. मराठा आरक्षण कायदे आणि प्रक्रिया, बाळासाहेब सराटे, साकेत प्रकाशन प्रा. लि. , २०१४

10. कर्तुत्वान मराठा स्त्रिया, विजय चोरमारे, विजिगीषा प्रकाशन, २०२०

-: संशोधक :-

निखिल गणेश जगताप

(एम.ए.)

मु.पो.पाबळ ता.शिरूर जि.पुणे

-: संशोधन मार्गदर्शक :-

डॉ. एम. बी. बेलखेडे

राज्यशास्त्र विभाग

(हुतात्मा पानसरे महाविद्यालय,अर्जापूर)